CS (Main) Exam : ,2014

C-DRN-N-L-OBSA

MARATHI

Paper I

(LITERATURE)

*Time allowed : **Three** Hours*

*Maximum Marks : **250***

QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

Please read each of the following instructions carefully before attempting questions :

*There are **EIGHT** questions divided in **TWO SECTIONS.***

*Candidate has to attempt **FIVE** questions in all.*

*Questions no. **1** and **5** are compulsory and out of the remaining, **THREE** are to be attempted choosing at least **ONE** from each section.*

The number of marks carried by a question / part is indicated against it.

*Answers must be written in **MARATHI**.*

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in chronological order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

SECTION A

Q1. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशे पन्नास (150) शब्दांत लिहा : *10×5=50*

(a) भाषेची लक्षणे कोणती ते सांगा. *10*

(b) बोलींच्या निर्मितीची कारणे कोणती असतात ? *10*

(c) नागपुरी बोलीचे प्रमुख विशेष सोदाहरण लिहा. *10*

(d) क्रियाविशेषण अव्यये कशाला म्हणतात ते उदाहरणे देऊन स्पष्ट करा. *10*

(e) म्हणींची स्वरूपवैशिष्ट्ये कोणती ? म्हणींमधून कोणकोणत्या विषयांचा सहजाविष्कार घडतो ? *10*

Optional Province · optionalprovince.com

Q2. (a) भाषा ही समग्र मानवी जीवनाला वेढून राहिलेली आहे, ती मानवी संस्कृतीचा पाया आहे असे का म्हटले जाते ? विवेचन करा. *20*

(b) सोस्यूरने भाषिक वर्तन (Parole) आणि भाषिक व्यवस्था (Langue) ही विभागणी कशा प्रकारे केली आहे ते समजावून सांगा. *15*

(c) डांगी या बोलीचे स्वरूप वेगवेगळ्या विशेषांच्या आधारे स्पष्ट करून डांगीविषयीच्या वादाची थोडक्यात माहिती लिहा. *15*

Q3. (a) तेराव्या शतकातील मराठी भाषेचे विशेष रूपविचार, शब्दसंग्रह, वाक्यरचना, वाक्प्रचार यांच्या संदर्भात उदाहरणांच्या आधारे नोंदवा. *20*

(b) विभक्ती अर्थावरून मानाव्यात की प्रत्ययावरून, या वादाचा उलगडा करा. *15*

(c) लोकनाट्यातील विनोदाला कोणकोणती अंगे असतात ते उदाहरणे देऊन स्पष्ट करा. *15*

Q4. (a) भाषिक संरचनेचा सर्वात महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे ती यांत्रिक स्वरूपाची नसते, या विधानाचे सविस्तर स्पष्टीकरण करा. *20*

(b) लोकगीतांच्या विविध व्याख्यांतून निष्पन्न होणारी लोकगीताची वैशिष्ट्ये सांगा. *15*

(c) लोककथांतील आशयाच्या विविधतेचे विवरण करा. *15*

Optional Province · optionalprovince.com

SECTION B

Q5. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशे पन्नास (150) शब्दांत लिहा : *10×5=50*

(a) महानुभावांच्या 'साती ग्रंथां'चा परिचय करून द्या. *10*

(b) वारकरी संप्रदायाच्या इतिहासातील संत नामदेवांच्या कार्याचे मर्म विशद करा. *10*

(c) पंडिती कविता संत काव्याहून कोणकोणत्या बाबतींत वेगळी ठरते ? *10*

(d) कुसुमाग्रजांच्या काव्यलेखनाचे वेगवेगळे विशेष कोणते ते सांगा. *10*

(e) 'कोसला' या कादंबरीचे मराठी कादंबरीच्या इतिहासतले वेगळेपण कशा प्रकारे सांगता येईल ? *10*

Q6. (a) 'तुका झालासे कळस' या उक्तीची अर्थपूर्णता विवेचनपूर्वक स्पष्ट करा. *20*

(b) बखर वाङ्मयाने मराठी साहित्यात कोणत्या प्रकारची समृद्धी आणली ? *15*

(c) दलित आत्मचरित्रलेखनाचे ऐतिहासिक महत्त्व कोणते ? *15*

Q7. (a) स्त्रियांच्या कथासाहित्याने मराठी कथाविश्वात कोणती कामगिरी बजावली ? *20*

(b) शंकर पाटील यांच्या ग्रामीण साहित्यनिर्मितीचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा. *15*

(c) साहित्य अणि समाज यांच्यात कोणत्या प्रकारचे संबंध असतात ? विवेचन करा. *15*

Q8. (a) ललित साहित्याचे शास्त्रीय साहित्याहून असणारे वेगळेपण कशा प्रकारे मांडता येईल ? *20*

(b) वाचकास व लेखकास समीक्षा कोणकोणत्या प्रकारे उपयोगी पडते ? *15*

(c) आस्वादक समीक्षा ही समीक्षाच नव्हे, या मताचा परामर्श घ्या. *15*

Optional Province · optionalprovince.com